**विषय:- निविदा नस्ती लेखा विभागास सादर करताना घ्यावयाचे दक्षतेबाबत....**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

**लेखा विभाग**

परिपत्रक क्र. लेखा/१३/कावि/ ७० /२०२०

दिनांक :-०५/०७/२०२०

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत विविध विकास कामांच्या तसेच वस्तु सेवा खरेदीकामी निविदा कार्यपध्दतीचा अवलंब केला जातो.सदर निविदा प्रक्रिया योग्य रितीने राबविणेबाबत यापुर्वी वेळोवेळी मार्गदर्शक सुचना,परिपत्रके,आदेश व शासन निर्णय निर्गत करण्यात आले असुन त्यातील सुचनांचे पालन करून विभागाने निविदा नस्ती दरांची स्विकृतीचे अभिप्रायासाठी लेखा विभागास सादर करणे अपेक्षित आहे.

**सबब, सर्व विभागप्रमुखांना सुचित करण्यात येते की, निविदा नस्ती लेखा विभागास सादर करताना परिपुर्ण स्वरूपात सादर कराव्यात, सदर निविदा नस्ती सादर करताना अद्यावत शासन निर्णयाशी सुसंगत व नियमाधीन असल्याची विभागाने खात्री करावी. तसेच खरेदी व विकास कामांसंदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांची अंमलबजावणी करावी.**

**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रति :- सर्व संबंधित विभागप्रमुख/शाखा अधिकारी

Scanned by CamScanner